आतील पानात वाचा


- तारकांच्या विश्वाचा महान अभ्यासक : डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर
- वसंत रांधवण यांना ‘सत्यशोधक पत्रकारिता’ पुरस्कार
- दिवा-शिळफाटा-महापे- कोपरखैरणे मेट्रोसाठी नगरसेवक पाटील आग्रही...



दैनिक **अक्षराज** अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



वर्ष : ०६ | अंक :०७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.२१ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# चाकरमान्यांच्या खिशाला कात्री! गणेशोत्सव विशेष गाड्यांसाठी नियमितपेक्षा दीड-दुप्पट भाडे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी रेल्वे प्रशासनाकडून विशेष गाड्या सोडण्यात येतात. मात्र, या विशेष गाड्यांसाठी नियमित गाड्यांपेक्षा मोठ्या प्रमाणात अधिक भाडे आकारले जात असतानाही त्यांना प्राधान्यक्रमात मागे ठेवले जाते. परिणामी, जास्त पैसे मोजूनही प्रवाशांना तासन्तास विलंबाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कोकणवासीयांमध्ये नाराजी आहे.




यंदा गणेशोत्सवासाठी मुंबईसह ठाणे, पालघर, पुणे आणि नागपूर येथे राहणाऱ्या कोकणवासीयांसाठी मध्य रेल्वेने २४६, तर पश्चिम रेल्वेने ६० विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. प्रवासी संघटनांनी मात्र ४०० फेऱ्यांची मागणी केली आहे.

मुंबई-खेड मार्गाचे उदाहरण घेतल्यास नियमित गाडीतील शयनयानाचे ( स्लीपर ) भाडे २०५ रुपये आहे. त्याच मार्गासाठी विशेष गाडीच्या स्लीपरसाठी ४०० रु. लागतात. एसी थ्री टायरसाठी ५२० रुपयांऐवजी १,०७० रुपये, तर एसी टू टायरसाठी ७२५ रुपयांऐवजी तब्बल १,४७० रुपये आकारले जाणार आहेत. म्हणजेच, विशेष गाडीच्या स्लीपरसाठी नियमित गाडीच्या तुलनेत जवळपास दुप्पट भाडे द्यावे लागते.

गणेशोत्सवात कोकणासाठी नियमित गाड्यांची क्षमता वाढवण्याऐवजी विशेष गाड्यांचा पर्याय पुढे केला जातो. मात्र, ‘पर्याय’ देण्याच्या नावाखाली अतिरिक्त पैसे मोजावे लागतात. त्यानंतरही विशेष गाड्यांना कमी प्राधान्य मिळत असल्याने तीन ते पाच तास, तर कधी त्याहून अधिक विलंब होतो.

**किमान अंतराची अट रद्द करा**

रेल्वे बोर्डाने २०१५ मध्ये विशेष गाड्यांसाठी तयार केलेल्या नियमांमध्ये ३० टक्के वाढीव भाड्याची तरतूद केली आहे. प्रत्यक्ष प्रवास ५०० किमीपेक्षा कमी असला तरी किमान ५०० किमीचे भाडे लागू होते. याचा सर्वाधिक फटका २०० ते ३०० किलोमीटर प्रवास करणाऱ्यांना बसतो. वाढीव दर असताना त्यात किमान अंतराची अट अन्यायकारक आहे. रेल्वे मंत्रालयाने या धोरणाचा फेरविचार करून विशेष गाड्यांसाठी लागू असलेली किमान अंतराची अट रद्द करावी, अशी मागणी कोकण विकास समितीचे सदस्य अक्षय महापदी यांनी केली आहे.

# चनकापूर ग्राउंड परिसरात कारमध्ये चौघे संशयास्पद स्थितीत आढळले

## दोन इसमासह दोन अल्पवयीन मुली ताब्यात...

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** खापरखेडा पोलिस स्टेशन हद्दीत अवैध धंदे व अमली पदार्थ विक्रीच्या वाढत्या घटनेमूळे सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा ऐरणीवर आली असताना पोलीस पेट्रोलिंग करीत असताना १८ ऑगस्ट मंगळवार रात्रीच्या सुमारास चनकापूर ग्राउंड परिसरात एका कार मध्ये दोन इसम व दोन अल्पवयीन तरुणी संशयास्पद स्थितीत आढळून आल्यामूळे एकच खळबळ उडाली आहे.




प्रवीण प्रशांत कानूने(५३) नागपूर, सुभाष सुधाकर उके(४१) इमाम वाडा व दोन अल्पवयीन तरुणींना खापरखेडा पोलिसानी ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार १८ ऑगस्ट मंगळवारला रात्री १०:३० च्या सुमारास खापरखेडा पोलिस पेट्रोलिंग करत होते. दरम्यान चनकापूर ग्राउंड परिसरात युनोवा कार क्रमांक एमएच-१५-जीएल-४७५५ संशयास्पदरित्या उभी असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तात्काळ कार जवळ जाऊन पाहणी केली असता यावेळी दोन इसम व दोन अल्पवयीन मुली अमली पदार्थाचे सेवन करत असल्याचे माहिती समोर येत आहे.

खापरखेडा पोलिसानी ताब्यात घेतलेले आरोपी नागपूर येथील रहिवासी असल्याचे कळते. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून कलम २७ व २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती मिळाली असून पुढील तपास सुरू आहे.

# नेरळ-माथेरान घाटरस्ता खड्ड्यात पर्यटकांसह वाहन चालक त्रस्त

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२०, माथेरान :** माथेरानला जोडणाऱ्या एकमेव नेरळ-माथेरान घाटरस्त्याची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, दस्तुरी कार पार्किंग, चांगभले, घाटातील प्रत्येक वळण, रेल्वे क्रॉसिंग, जुमापट्टी ते नेरळ प्रवेशद्वारापर्यंत ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाच्या पाण्यामुळे रस्त्याला चर पडल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.विशेषतः धोकादायक एस वळणावर काही काळापूर्वी करण्यात आलेल्या दुरुस्तीची बारीक खडी आता निघून गेल्याने रस्ता पुन्हा धोकादायक झाला आहे. दुचाकीस्वारांना या ठिकाणी जीव मुठीत घेऊन वाहन चालवावे लागत आहे. मोठी वाहने चढ चढताना चाके जागेवरच फिरत असून, खड्ड्यांमध्ये वाहने आदळल्याने अनेक वाहनांचे नुकसान होत आहे. त्यामुळे वाहनमालकांवर दुरुस्तीचा अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. याशिवाय पावसाचे पाणी गटारातून वाहून जाण्याऐवजी अनेक ठिकाणी थेट रस्त्यावरून वाहत असल्याने रस्त्याची झीज अधिक वेगाने होत आहे. योग्य पाणी निचरा व्यवस्था नसल्याने खड्डे आणि चर दिवसेंदिवस वाढत आहेत.



२०२० मध्ये सुमारे ३६ कोटी रुपये खर्च करून चचठ्अ मार्फत हा घाटरस्ता पूर्ण करण्यात आला होता. त्यानंतर गेल्या वर्षी एस वळण ते नेरळपर्यंत किरकोळ दुरुस्ती करण्यात आली. मात्र रस्त्याची नियमित देखभाल आणि आवश्यक दुरुस्ती वेळेत न झाल्याने अवघ्या सहा वर्षांत रस्त्याची अवस्था खराब झाली आहे. सध्या या रस्त्याची दुरुस्ती व देखभाल झथृ मार्फत करण्यात येत आहे.नेरळ-माथेरान हा माथेरानसाठी एकमेव प्रमुख संपर्कमार्ग असल्याने त्याकडे दुर्लक्ष करणे माथेरानच्या पर्यटनासाठी मोठे संकट ठरू शकते. रस्ता खराब असल्याने पर्यटकांना त्रास होत असून, वाहनचालकांमध्येही नाराजी आहे. रस्त्याची अवस्था आणखी गंभीर झाली किंवा वाहतूक बंद पडली, तर माथेरानच्या पर्यटन व्यवसायावर त्याचा थेट परिणाम होणार आहे.

त्यामुळे झथृ व संबंधित प्रशासनाने तातडीने संपूर्ण घाटरस्त्याची पाहणी करून मोठे खड्डे बुजविणे, रस्त्याला पडलेल्या चरी दुरुस्त करणे, पाणी निचऱ्याची गटारे साफ व दुरुस्त करणे आणि धोकादायक वळणांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

३६ कोटींच्या रस्त्याची सहा वर्षांत अशी अवस्था का झाली? नियमित देखभाल कुठे झाली? असा सवाल आता स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.

# कोळसा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रति एकर ३० लाख रुपये मोबदला देण्याची ठाम मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** कोळसा प्रकल्पांसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (डब्ल्यु. सी.एल.) मार्फत अधिग्रहित करण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य आणि न्याय्य मोबदला मिळावा, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीनुसार मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला आहे. कोळसा प्रकल्पांसाठी अधिग्रहित होणाऱ्या कृषी जमिनीच्या मोबदल्यात सुधारणा करून शेतकऱ्यांना प्रति एकर ३० लाख रुपये मोबदला मिळावा, तसेच पात्र जमीनमालकांना कोल इंडिया लिमिटेडच्या पुनर्वसन व पुनर्स्थापना धोरण, २०१२ नुसार रोजगार मिळावा, अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशनजी रेड्डी यांच्याकडे हा प्रस्ताव पाठवला आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिनांक ५ जून २०२६ रोजी पत्राद्वारे डब्ल्युसीएल मार्फत अधिग्रहित करण्यात येणाऱ्या कृषी जमिनीच्या मोबदल्यात सुधारणा करून प्रति एकर ३० लाख रुपये मोबदला देण्याची मागणी केली होती. कोळसा प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जात असताना जुन्या दरानुसार मिळणारा मोबदला हा सध्याच्या जमीन



व्यवहारांच्या तुलनेत अत्यल्प आहे. त्यामुळे बदललेल्या परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळणे आवश्यक असल्याची भूमिका आ. मुनगंटीवार यांनी मांडली होती.

२५ मे २०१२ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार कोळसा खाणींसाठी अधिग्रहित होणाऱ्या जमिनीचे दर निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार पडीक जमिनीसाठी ६ लाख रुपये, जिरायती जमिनीसाठी ८ लाख रुपये आणि ओलित (बागायती) जमिनीसाठी १० लाख रुपये प्रति एकर असे दर निश्चित करण्यात आले होते. मात्र, गेल्या काही वर्षांत जमिनीच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामुळे २०१२ मधील जुन्या दरांऐवजी सध्याच्या परिस्थितीशी सुसंगत असा सुधारित मोबदला निश्चित करून प्रति एकर ३० लाख रुपये देण्यात यावेत, ही आ. सुधीर मुनगंटीवार यांची ठाम मागणी आहे.

# तंत्रज्ञानाच्या युगातही वर्तमान पत्रात छापून येणाऱ्या बातमीवर वाचकांची विश्वासार्हता आजही टिकून आहे : डॉ. श्रीपाल सबनिस

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** सोशल मीडियाच्या तंत्रज्ञानाच्या युगातही वर्तमान पत्रात छापून येणाऱ्या बातमीवर वाचकांची विश्वासार्हता आजही टिकून आहे. राज्यकर्त्यांना झुकवण्याची व समाज घडवण्याची ताकद पत्रकारांच्या लेखणीत आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पत्रकारांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पत्रकारिता करावी. दैनिक अक्षराज मीडिया घेत असलेले पुरस्काराराासारखे विविध सामाजिक उपक्रम स्तुत्य आहेत, असे मत ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनिस यांनी व्यक्त केले.

पुणे येथील पत्रकार भवन सभागृहात नुकताच राज्यातील दैनिक अक्षराज मीडिया वर्तमानपत्राच्या पाचव्या वर्धापनदिन व स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनिस, झोपडपट्टी सुधार दलाचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम, सुप्रसिद्ध कवी हेमंत मुसरीफ, अक्षराज मेडियाचे संपादक विनोद गोरे, सहसंपादीका प्राजक्ता चव्हाण -गोरे व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील पत्रकार बांधवाची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. श्रीपाल सबनिस म्हणाले की, स्वयंप्रेरणेने मिळवलेले यश कायमस्वरूपी टिकते. समाजासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्यांच्या कार्याची हीच खरी पावती म्हणजे अक्षराज सत्यशोधक, अचूक वेध, पत्रकारिता पुरस्कार होय आपल्या कार्याचा ठसा उमटवा आणि कधीही थांबू नका, असे प्रेरणादायी प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.





विविध सोशल मीडिया माध्यमाची धूम असतानाही प्रिंट मीडियाचे महत्व कायम आहे. आजही वर्तमान पत्रातून येणाऱ्या बातम्यांवर वाचकांची विश्वासार्हता आहे. पत्रकारांनी सामाजिक बांधिलकीतून वार्तांकन करून सर्वसामान्यांच्या प्रश्नांची न्याय भूमिका बजावावी.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक रवींद्र कदम, सुप्रसिद्ध कवी हेमंत मुसरीफ, भगवानराव वैराट यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी अक्षराज मीडियाच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल जेष्ठ पत्रकार वसंत रांधवण व विनोद वास्कर, पंकज दर्शले, प्रणिल कुसाळे, सुनील क्षीरसागर, कृष्णा श्रावण पाटील,अलिम शेख, दत्ता हामंद, संजीवन चव्हाण तसेच संदीप येवले यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक संपादक विनोद गोरे यांनी तर सूत्रसंचालन एकनाथ सकपाळ यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार सहसंपादीका प्राजक्ता चव्हाण- गोरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी अक्षराज मीडियाचे सर्व पत्रकार यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर, प्रतिष्ठीत नागरीक, लेखक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विश्वासाहर्ता, सातत्य आणि समाजाभिमुख पत्रकारिता**

विश्वासार्हता, सातत्य आणि समाजाभिमुख पत्रकारिता या त्रिसूत्रीच्या बळावर दैनिक अक्षराज वृत्तपत्रसृष्टीत स्वतः चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आम्ही सामान्य कुटुंबातून येत असल्याने अनेक चढउतार पाहिले आहेत. ज्यांनी कधी पत्रकारिता क्षेत्रात काम केले नाही त्यांना घडवण्याचे कार्य वर्तमानपत्राच्या माध्यमातून आम्ही करीत आहोत. शोषित वंचित घटकांच्या वेदना जवळून पाहिल्या. त्याच जाणिवेतून अक्षराज मेडिया ५ वर्षांची वाटचाल ही केवळ एका वृत्तपत्राची नव्हे, तर वाचकांशी निर्माण झालेल्या विश्वासाच्या नात्याची कहाणी आहे. आणि आता नव्या सहाव्या वर्षात पदार्पण करत आहे. याचे सर्व श्रेय आमच्या वाचक, जाहिरातदार आणि हितचिंतक व आमच्या पत्रकार बांधवांना जाते. त्यांच्याच पाठबळावर अक्षराजची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

**– विनोद गोरे, संपादक (अक्षराज मीडिया)**




## आसामच्या महापुराचा सांगावा

आसाममधील पूर ही काही नवीन घटना नाही. तिबेटच्या उंच पठारावर उगम पावलेली ब्रह्मपुत्रा अरुणाचल प्रदेशातून भारतात प्रवेश करून आसामच्या विस्तीर्ण मैदानातून वाहते. या प्रवासात तिच्या असंख्य उपनद्या मान्सूनच्या काळात प्रचंड जलप्रवाह घेऊन येतात. त्यामुळे ब्रह्मपुत्रा आणि तिच्या उपनद्या दर वर्षी पात्राबाहेर वाहतात आणि आसामच्या विस्तीर्ण मैदानांना जलमय करतात. हजारो वर्षांपासून हा पूर या प्रदेशाच्या नैसर्गिक जलचक्राचा भाग राहिला आहे. याच पुरामुळे सुपीक गाळ साचतो, शेतीला पोषक जमीन तयार होते आणि ब्रह्मपुत्रा खोऱ्याची परिसंस्था टिकून राहते. त्यामुळे पूर हा त्या प्रदेशाच्या भूगोलाचा आणि निसर्गाचा अविभाज्य भाग आहे.

मात्र अलीकडच्या काळात एक महत्त्वाचा बदल दिसून येत आहे. पूर्वीचा नैसर्गिक पूर आता अधिक वारंवार मानवी आपत्तीत बदलताना दिसतो. जीवितहानी, शेतीचे नुकसान, उद्ध्वस्त होणाऱ्या वस्त्या, विस्कळित होणारी वाहतूक व्यवस्था आणि आर्थिक हानी यामुळे या पुराचे स्वरूप अधिक गंभीर बनले आहे.


या पुरामागे एकच कारण शोधण्याचा मोह अनेकदा अनेकांना होतो. काही जण संपूर्ण दोष हवामान बदलावर टाकतात, तर काही जण केवळ अतिवृष्टी किंवा हिमालयातील भूस्खलनाकडे बोट दाखवतात. प्रत्यक्षात हा पूर मान्सून, पूर्व हिमालयाचा भूगोल, ब्रह्मपुत्रा नदीची जलव्यवस्था, नदीतील गाळ आणि मानवी हस्तक्षेप यांच्या एकत्रित परिणामातून निर्माण होतो.

खरे तर यंदाच्या पुराची सुरुवात आसाममध्ये नव्हती. याची चाहूल पूर्व हिमालयातील डोंगराळ प्रदेशात लागली होती. अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि आसपासच्या उंच भागात अल्पावधीत झालेल्या मुसळधार पावसामुळे डिखो, दिसांग, झांजी आणि अशा अनेक उपनद्यांमधून प्रचंड वेगाने पाणी खाली आले. डोंगर उतरताना वेगाने धावणारे हे पाणी सपाट आसामच्या मैदानात पोहोचताच त्याचा वेग कमी होतो. नदीपात्राची क्षमता अपुरी पडते आणि पाणी मोठ्या प्रमाणावर आसपासच्या प्रदेशात पसरते. म्हणूनच आसाममधील पूर हा केवळ स्थानिक पावसाची कथा नसून संपूर्ण ब्रह्मपुत्रा नदी खोऱ्याच्या जलचक्राची कथा आहे. ब्रह्मपुत्रेचा भूगोल या संपूर्ण प्रक्रियेत मध्यवर्ती भूमिका बजावतो. जगातील सर्वाधिक गाळ वाहून नेणाऱ्या नद्यांमध्ये ब्रह्मपुत्रेचा समावेश होतो. भूवैज्ञानिकदृष्ट्या तरुण असलेल्या हिमालयात धूप आणि अपरदनाचा वेग मोठा असल्याने दर वर्षी प्रचंड प्रमाणात गाळ नदीत जमा होतो. हा गाळ नदीच्या तळात साचत राहिल्याने नदीची खोली कमी होते आणि तिची वहनक्षमता घटते. वाढत्या तापमानामुळे वातावरण अधिक आर्द्रता धारण करू लागले असून, अनुकूल मान्सून परिस्थितीत अल्पावधीत अतिवृष्टीची शक्यता वाढते. हवामान बदल प्रत्येक पुराला कारणीभूत नसला, तरी तो नैसर्गिक मान्सून प्रक्रियेला अधिक तीव्र बनवून अशा घटनांची तीव्रता वाढवतो. पूर्व हिमालयातील मान्सूनच्या नैसर्गिक परिवर्तनशीलतेचाही येथे विचार करावा लागेल. आम्ही २०२३ मध्ये प्रकाशित केलेल्या संशोधनात १९७९ ते २०२१ या कालावधीचा अभ्यास केला. त्यातून हवामान बदलाचा दीर्घकालीन प्रभाव वेगळा केल्यानंतरही पूर्व हिमालयात अत्यंत ओली आणि अत्यंत कोरडी मान्सून वर्षे नैसर्गिकरीत्या पुनरावृत्त होत असल्याचे दिसून आले. गंगा आणि ब्रह्मपुत्रा नदीप्रणालीतील पाणीप्रवाहातील या चढ-उतारांमध्ये पर्जन्यमानाची भूमिका सर्वाधिक महत्त्वाची होती, तर हिमनद्या किंवा बर्फ वितळण्याचा वाटा तुलनेने कमी होता. विशेष म्हणजे, मान्सूनमधील पर्जन्यमान आणि उष्णकटिबंधीय महासागरांतील समुद्रपृष्ठ तापमानातील बदल हे या परिवर्तनशीलतेचे प्रमुख नियंत्रक असल्याचे आढळले. त्यामुळे ब्रह्मपुत्रा खोऱ्यातील पूर समजून घ्यायचा असेल, तर केवळ स्थानिक पावसाचा विचार पुरेसा नाही; संपूर्ण मान्सून प्रणाली आणि पूर्व हिमालयातील वातावरणीय प्रक्रियांचा विचार करावा लागेल. म्हणून हिमालयीन नदीखोऱ्यांसाठी परिणामाधारित पूरपूर्व सूचना प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे.

यंदाच्या मान्सूनने आणखी एक महत्त्वाचा धडा दिला आहे. हंगामाच्या सुरुवातीला मान्सून उशिरा दाखल झाल्यामुळे एल निनोचा मान्सूनवर परिणाम होणार का, यावर मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू झाली होती. मात्र, काही आठवड्यांतच परिस्थिती पूर्णपणे बदलली आणि देशातील अनेक भागांत अतिवृष्टी व पूरस्थिती निर्माण झाली. यावरून पुन्हा एकदा स्पष्ट होते की, मान्सूनच्या सुरुवातीचा वेग किंवा एखाद्या जागतिक हवामान निर्देशांकावरून संपूर्ण हंगामाचे चित्र ठरवता येत नाही.

**- डॉ. प्रतीक कड**

# तारकांच्या विश्वाचा महान अभ्यासक : डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर



विश्वाच्या अथांग पसाऱ्यात असंख्य तारे जन्माला येतात, तेजस्वीपणे प्रकाशतात आणि कालांतराने त्यांच्या जीवनाचा शेवट होतो. या ताऱ्यांचा जन्म, त्यांची उत्क्रांती, त्यांचे वस्तुमान आणि त्यांच्या अंतिम अवस्थेचा अभ्यास करणाऱ्या महान शास्त्रज्ञांमध्ये डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. भारतीय वंशाचे महान खगोलभौतिकशास्त्रज्ञ असलेल्या चंद्रशेखर यांनी आपल्या गणिती प्रतिभेच्या जोरावर तारकीय उत्क्रांतीविषयीचे अनेक महत्त्वाचे प्रश्न सोडवले. त्यांच्या संशोधनामुळे आधुनिक खगोलभौतिकशास्त्राला नवी दिशा मिळाली. त्यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या विलक्षण वैज्ञानिक योगदानाचे स्मरण करणे म्हणजे भारतीय विज्ञानपरंपरेला अभिवादन करण्यासारखे आहे.

डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९१० रोजी लाहोर येथे झाला. त्यांचे वडील चंद्रशेखर सुब्रह्मण्य अय्यर हे सरकारी सेवेत होते. त्यांचे कुटुंब विद्वत्तापूर्ण आणि सांस्कृतिक वातावरणासाठी प्रसिद्ध होते. त्यांचे काका सर सी. व्ही. रामन हे जगप्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ आणि नोबेल पुरस्कार विजेते होते. अशा प्रतिभावान वातावरणाचा चंद्रशेखर यांच्या बौद्धिक जडणघडणीवर निश्चितच प्रभाव पडला.

लहानपणापासूनच चंद्रशेखर यांना गणित आणि विज्ञानाची विशेष आवड होती. त्यांचे शिक्षण मद्रासमध्ये झाले. त्यांनी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्राचे शिक्षण घेतले. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रात स्वतंत्र संशोधन सुरू केले. पुढील उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात गेले. तेथे ट्रिनिटी कॉलेजशी त्यांचा संबंध आला आणि त्यांनी खगोलभौतिकशास्त्रातील अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांचा अभ्यास सुरू केला.

**'चंद्रशेखर मर्यादा' :** तारकीय विज्ञानातील क्रांतिकारी सिद्धांत

डॉ. चंद्रशेखर यांचे सर्वात प्रसिद्ध योगदान म्हणजे 'चंद्रशेखर मर्यादा' (Chandrasekhar Limit). ताऱ्यांचे जीवन संपल्यानंतर त्यांचे काय होते, हा त्या काळातील खगोलशास्त्रातील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता.

१९३० मध्ये भारतातून इंग्लंडकडे समुद्रप्रवास करत असताना तरुण चंद्रशेखर यांनी या प्रश्नाचा सखोल विचार केला. क्वांटम मेकॅनिक्स, विशेष सापेक्षतावाद आणि तारकीय संरचनेचा गणिती अभ्यास यांचा उपयोग करून त्यांनी श्वेत बटू ताऱ्यांच्या कमाल वस्तुमानाची मर्यादा निश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या गणनेनुसार ही मर्यादा सूर्याच्या वस्तुमानाच्या सुमारे १.४४ पट आहे.

याचा अर्थ असा की एखाद्या ताऱ्याचे अंतिम वस्तुमान या मर्यादेपेक्षा कमी असेल तर तो श्वेत बटूच्या अवस्थेत स्थिर राहू शकतो; परंतु अधिक वस्तुमान असलेल्या ताऱ्यांना केवळ श्वेत बटू अवस्थेत स्थिर राहणे शक्य नसते. अशा ताऱ्यांच्या पुढील उत्क्रांतीत गुरुत्वाकर्षणामुळे अधिक गंभीर स्वरूपाचे संकुचन घडू शकते. पुढे न्यूट्रॉन तारे आणि कृष्णविवरांच्या अभ्यासाशी संबंधित आधुनिक सिद्धांत विकसित होत गेले.

चंद्रशेखर यांचा हा सिद्धांत त्यांच्या काळात सर्वांनी सहज स्वीकारला नाही. प्रख्यात ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ सर आर्थर एडिंग्टन यांनी त्यांच्या निष्कर्षांवर तीव्र आक्षेप घेतला. त्यामुळे तरुण चंद्रशेखर यांच्या संशोधनाला सुरुवातीला मोठा विरोध सहन करावा लागला. मात्र त्यांनी आपले संशोधन सोडले नाही. त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आपले गणिती विश्लेषण पुढे नेले.

१९३९ मध्ये त्यांनी An Introduction to the Study of Stellar Structure हे महत्त्वपूर्ण पुस्तक प्रकाशित केले. तारकीय संरचना आणि उत्क्रांतीच्या अभ्यासातील हे पुस्तक पुढील संशोधनासाठी अत्यंत प्रभावी ठरले.

**विरोधातून मान्यतेकडे !**

वैज्ञानिक क्षेत्रात एखादी नवी कल्पना मांडणे जितके महत्त्वाचे असते, तितकेच तिच्या सत्यतेसाठी सातत्याने प्रयत्न करणे महत्त्वाचे असते. चंद्रशेखर यांच्या बाबतीत हे विशेषत्वाने दिसून येते. सुरुवातीला त्यांच्या सिद्धांतावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले, परंतु पुढील दशकांमध्ये खगोलभौतिकशास्त्राच्या प्रगतीबरोबर त्यांच्या गणिती निष्कर्षांचे महत्त्व अधिकाधिक स्पष्ट होत गेले.

ताऱ्यांची रचना, त्यांचे आयुष्य, ऊर्जा निर्माण करण्याची प्रक्रिया आणि ताऱ्यांच्या अंतिम अवस्थांचा अभ्यास करण्यासाठी चंद्रशेखर यांनी केलेले योगदान अत्यंत व्यापक होते. त्यांचे संशोधन केवळ एका सिद्धांतापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी विकिरण स्थानांतरण, तारकीय गतिशास्त्र, कृष्णविवरांचे गणिती सिद्धांत आणि द्रवगतिकी अशा अनेक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण काम केले.

**नोबेल पुरस्काराने गौरव !**

डॉ. चंद्रशेखर यांच्या प्रदीर्घ आणि मूलभूत वैज्ञानिक योगदानाची अखेर जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली. १९८३ मध्ये त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार देण्यात आला. विल्यम ए. फाउलर यांच्यासोबत त्यांना हा पुरस्कार मिळाला. नोबेल समितीने तारकांची संरचना आणि उत्क्रांती यांच्याशी संबंधित भौतिक प्रक्रियांच्या सैद्धांतिक अभ्यासासाठी चंद्रशेखर यांचा गौरव केला.

हा पुरस्कार त्यांच्या वैयक्तिक कर्तृत्वाचा गौरव तर होताच; परंतु भारतीय वैज्ञानिक प्रतिभेचा जागतिक स्तरावर झालेला सन्मानही होता. विज्ञानाला देशांच्या सीमा नसतात, हे चंद्रशेखर यांच्या जीवनातून स्पष्ट होते. भारतात जन्मलेला एक तरुण वैज्ञानिक पुढे अमेरिकेत संशोधन करत जागतिक विज्ञानविश्वातील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व बनला.

**शिकागो विद्यापीठातील प्रदीर्घ कारकीर्द**

१९३७-३९ च्या काळात चंद्रशेखर अमेरिकेतील शिकागो विद्यापीठाशी जोडले गेले आणि पुढे तेथे त्यांनी प्रदीर्घ काळ अध्यापन व संशोधन केले. शिकागो विद्यापीठ त्यांच्या वैज्ञानिक जीवनाचे प्रमुख केंद्र ठरले. तेथे त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि पुढील पिढीतील वैज्ञानिक घडवले.

चंद्रशेखर यांची कार्यपद्धती अत्यंत शिस्तबद्ध होती. गणिती अचूकता, तर्कशुद्ध विचार आणि विषयाचा सखोल अभ्यास ही त्यांच्या संशोधनाची वैशिष्ट्ये होती. एखाद्या समस्येचा वरवर विचार न करता तिच्या मुळाशी जाणे आणि त्यामागील गणिती संरचना समजून घेणे हा त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा भाग होता.

**विज्ञानाबरोबरच साहित्य आणि सौंदर्यदृष्टी**

चंद्रशेखर केवळ कठोर गणिती संशोधक नव्हते. विज्ञानातील सौंदर्य आणि साहित्यिक अभिव्यक्ती यांचेही त्यांना आकर्षण होते. त्यांनी विज्ञानातील अनेक गुंतागुंतीच्या संकल्पनांचा अत्यंत सुसूत्र आणि सुंदर पद्धतीने अभ्यास केला. विज्ञानात सौंदर्य असते आणि एखाद्या वैज्ञानिक सिद्धांताची रचना ही कलाकृतीइतकीच मोहक असू शकते, अशी त्यांची व्यापक दृष्टी होती.

त्यांनी विविध विषयांवर अनेक पुस्तके आणि संशोधनपर लेख लिहिले. त्यांच्या लेखनातून विज्ञानातील स्पष्टता, काटेकोरपणा आणि बौद्धिक प्रामाणिकपणा जाणवतो.

**अनेक पुरस्कारांचा सन्मान !**

नोबेल पुरस्काराव्यतिरिक्त चंद्रशेखर यांना अनेक प्रतिष्ठित सन्मान मिळाले. त्यांना भारत सरकारने पद्मविभूषण देऊन गौरविले. अमेरिकेतील आणि आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक संस्थांनीही त्यांच्या संशोधनाचा सन्मान केला. त्यांच्या नावाने पुढे 'चंद्रा एक्स-रे वेधशाळे'ला नाव देण्यात आले. अवकाशातील कृष्णविवरे, न्यूट्रॉन तारे आणि अतिउष्ण खगोलीय वस्तूंचा अभ्यास करण्यासाठी अशा वेधशाळांचे महत्त्व मोठे आहे.

**शेवटपर्यंत विज्ञानाशी नाते...**

डॉ. चंद्रशेखर यांनी आपले संपूर्ण आयुष्य संशोधन, अध्यापन आणि ज्ञाननिर्मितीसाठी वाहून घेतले. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या काळापर्यंत विज्ञानाशी त्यांचे नाते कायम राहिले. २१ ऑगस्ट १९९५ रोजी शिकागो येथे त्यांचे निधन झाले. त्यांचे आयुष्य सुमारे ८४ वर्षांचे होते.

आज त्यांच्या निधनाला अनेक वर्षे झाली असली तरी त्यांचे संशोधन आधुनिक खगोलभौतिकशास्त्राचा अविभाज्य भाग आहे. ताऱ्यांच्या उत्क्रांतीचा अभ्यास करताना 'चंद्रशेखर मर्यादा' ही संकल्पना आजही अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

भारतीय तरुणांसाठी प्रेरणादायी जीवन

डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांचे जीवन केवळ एका महान वैज्ञानिकाची जीवनकथा नाही; ते जिज्ञासा, चिकाटी, तर्कशक्ती आणि वैज्ञानिक प्रामाणिकपणाचा आदर्श आहे. एखादा विचार सुरुवातीला स्वीकारला गेला नाही म्हणून तो सोडून न देता पुराव्यांच्या आणि गणिताच्या आधारे त्याचा पाठपुरावा करणे, हा त्यांचा सर्वात मोठा संदेश आहे.

आज भारत विज्ञान, तंत्रज्ञान, अवकाश संशोधन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अशा विविध क्षेत्रांत पुढे जात आहे. अशा वेळी चंद्रशेखरांसारख्या वैज्ञानिकांचे स्मरण करणे अधिक आवश्यक आहे. त्यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांनी केवळ नोबेल पुरस्काराचे स्वप्न पाहू नये, तर प्रश्न विचारण्याची, सत्य शोधण्याची आणि ज्ञानाच्या सीमांचा विस्तार करण्याची वृत्ती विकसित करावी, हीच खरी अपेक्षा आहे.

डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांनी आकाशातील ताऱ्यांचा अभ्यास करताना मानवाच्या ज्ञानाच्या क्षितिजालाच विस्तार दिला. त्यांच्या संशोधनामुळे विश्वाकडे पाहण्याची आपली दृष्टी अधिक व्यापक झाली. त्यांचे शरीर काळाच्या पडद्याआड गेले असले तरी त्यांनी विश्वाच्या रहस्यांवर उमटवलेली बौद्धिक छाप आजही कायम आहे. २१ ऑगस्ट या त्यांच्या स्मृतिदिनी या महान भारतीय वंशाच्या वैज्ञानिकाला विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## न्यायालयी

न्यायालयी धावू नये
होता जरा खिटपीट
पायरी ती चढताना
विचार सखोल नीट

वकीलअसावा भला
छान कायदा पंडीत
वेळ काळ बंधन ना
केसे चाले अखंडीत

टाकावे लागते दान
भरघोस तया हुंडीत
अडचणी पाहू कुणी
गाठे नेमका खिंडीत

साक्षीदार जमविता
भलीकिती पायपीट
सादर करावे पुरावे
असे अति किटकीट

तारखा पुढे तारखा
येतो कधी खूप वीट
पक्के हवे बांधकाम
दणकटभाजली वीट

निकाल लागे सुलटा
काढा दृष्ट लावा तीट
निकाल लागे उलटा
दाखल पेटिशन रीट


**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# सान्वी अंदाडे व प्रबोध सावंत यांचे पुन्हा तायक्वांदो स्पर्धेत अद्वितीय यश

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.१९, मुंबई :** चेंबूर येथे कलेक्टर कॉलनी मनपा शाळेत SSN World Taekwondo Club यांच्या वतीने ३री सबर्बन मुंबई सब - जुनिअर आणि पी वी इंटरक्लब तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२६, दि.१६ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आली.

ह्या स्पर्धेत लालबाग व अंबरनाथ येथील स्पोर्ट्स तायक्वांदो अकादमीच्या सान्वी अंदाडे वय वर्षे ६ हिने १५ किलो वजनी गटात सुवर्णपदक मिळवले असून या पूर्वी ही मुंबई महापौर चषक स्पर्धेत सर्वात कमी वयोगटात सुवर्ण पदक मिळवणारी, सलग दोन स्पर्धेत २ सुवर्ण पदक संपादन करणारी सुवर्ण कन्या म्हणून अंबरनाथ येथून तिचा सत्कार व प्रशंसा करण्यात येत आहे. भावी भवितव्यासाठी संपूर्ण अंबरनाथ मधून प्रेरणात्मक शुभेच्छा ही दिल्या जात आहेत.



तसेच अकादमीच्या लालबाग शाखेतील प्रबोध सावंत याने वय ८वर्षे वयोगटाच्या ३५ किलो वरील वजनी गटात रौप्य पदकांची कमाई केली आहे. याने मुंबई महापौर स्पर्धेतही रौप्य पदक पटकावले होते. या दोन्ही शाखेला प्रमुख प्रशिक्षक सुनिल साखरकर, सहाय्यक प्रशिक्षक संजय चंदा, अक्षय खोत व जान्हवी प्रग्नेश सावंत यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

ही स्पर्धा वय वर्षे ६, ८ व १२ वर्षाखालील मुला -मुलींच्या वयोगटात खेळवण्यात आली. स्पर्धेच्या प्रमुख उदघाट्न सोहळ्यास अतिथी म्हणून अक्षराज वर्तमानपत्र व मीडियाचे पत्रकार सुनिल साखरकर तसेच आयोजक असीम सिंग सोदी, स्पर्धा व्यवस्थापन पंच कमिटी यांची उपस्थिती होती.

# खापरखेडा गँगवार प्रकरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांची बदली

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** खापरखेडा मुख्य बाजारपेठेत २ ऑगस्टच्या रात्री घडलेल्या दगडी चाळ गँगवार व एमडी तस्करीच्या पार्श्वभूमीवर अखेर प्रशासकीय कुऱ्हाड कोसळली आहे. खापरखेडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष लक्ष्मण रुमकर यांची उचलबांगडी करण्यात आली असून त्यांच्या जागी आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप विनायक बुवा नवीन पदभार स्वीकारणार आहेत.

यासंदर्भात नागपूर शहर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी १९ ऑगस्ट बुधवारला आदेश जारी केले आहेत. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जनता दरबारात गँगवार व खापरखेडा



परिसरात वाढत्या अवैध धंद्यांचे तीव्र पडसाद उमटले. पालकमंत्र्यांनी शहर पोलीस आयुक्तांना गुन्हेगारांवर कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत, शिवाय पोलीस आयुक्त कार्यालयात विशेष बैठक बोलावण्यात आली होती त्यात पालकमंत्री बावनकुळे स्वतः या आढावा बैठकीला उपस्थित होते. २ ऑगस्ट रोजी खापरखेडा मुख्य बाजारपेठेत तलवार, चाकू आणि फावड्यांनी हिमांशू कडू, रोहित मेश्राम व रक्षित कापसे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. या गँगवारमध्ये तिघेही गंभीर जखमी झाले असून परिसरात दहशतीचे वातावरण आहे.

खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत सुरू असलेले अवैध धंदे व एमडी सारख्या अंमली पदार्थांची विक्री होत असल्यामूळे गँगवार भडकल्याचा थेट आरोप स्थानिक नागरिकांनी केला होता यासंदर्भात विशेष ग्रामसभा घेण्यात आल्या होत्या.

अखेर नागपूर शहर पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष लक्ष्मण रुमकर यांच्या बदलीचे आदेश १९ ऑगस्ट बुधवारला काढले असून त्यांची आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली आहे.

त्यांच्या जागेवर आर्थिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप विनायक बुवा यांची बदली करण्यात आली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### खर्डी गावात टोरंट पॉवरचा ग्राहक संवाद मेळावा
### ३५० नवीन वीज मीटर कार्यान्वित...
### नागरिकांच्या शंकांचे जागेवरच निरसन...



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, खर्डी (ठाणे) :** टोरंट पॉवर लिमिटेडच्या (TPL) वतीने आज खर्डी गावात स्थानिक नागरिकांसाठी एका विशेष संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. हा मेळावा स्थानिक नगरसेवक बाबाजी पाटील आणि नगरसेविका अर्चना पाटील यांच्या सहकार्याने पार पडला. या उपक्रमामुळे खर्डी गावातील ३५० नवीन वीज मीटर कार्यान्वित झाले असून, सर्व ग्रामस्थांना अधिकृत वीज पुरवठ्याशी जोडण्यात आले आहे.

या मेळाव्यात टोरंट पॉवरच्या अधिकाऱ्यांनी वीज दर (टॅरिफ), बिलिंग सायकल, अचूक मीटर रीडिंग तसेच घरगुती विद्युत उपकरणांचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर याविषयी ग्रामस्थांना सविस्तर माहिती दिली. उपस्थित नागरिकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे आणि शंकांचे अधिकाऱ्यांनी थेट जागेवरच समाधानकारक निरसन केले.

या कार्यक्रमास नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील यांच्यासह टोरंट पॉवरचे एजीएम प्रकाश चंदन, जनसंपर्क व्यवस्थापक शशिकांत, राहुल आमडे, नागेश आणि बहुसंख्य खर्डी ग्रामस्थ उपस्थित होते.

---

### खर्डी गावातील अग्निशमन केंद्रासाठी १० हजार लिटर क्षमतेचे वाहन द्या – वेदिका पाटील यांची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, दिवा (ठाणे) :** दिवा–शिळ रोड जवळील खर्डी गाव परिसरात नवीन अग्निशमन केंद्रासाठी १० हजार लिटर क्षमतेचे अग्निशमन वाहन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी प्रभाग क्र. २९(ब) च्या नगरसेविका वैदिका साहिल पाटील यांनी ठाणे महानगरपालिकेकडे केली होती.

या संदर्भात ठाणे अग्निशमन दलाकडून उत्तर देताना सांगण्यात आले की, सध्या ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे ८ अग्निशमन केंद्रे आणि ३ बिट केंद्रे कार्यरत आहेत. मात्र सध्या मनुष्यबळाची कमतरता असल्याने नवीन मागण्यांवर त्वरित कार्यवाही करणे शक्य नाही.

महापालिकेमार्फत अग्निशमन दलात भरती प्रक्रिया सुरू असून, ती पूर्ण झाल्यानंतर आणि पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध झाल्यानंतर खर्डी येथील मागणीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. दिनांक १२/०८/२०२६ रोजी विभागीय अग्निशमन अधिकारी यांनी याबाबतचे पत्र नगरसेविका पाटील यांना दिले आहे.

---

### रेशनच्या लाभार्थींची अशास्त्रीय उत्पन्न निकस बदलण्याची अन्न अधिकार संघाची मागणी मोहीम सुरू



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, मुंबई :** अन्न अधिकार संघ हे मुंबई नियंत्रक शिधावाटप कार्यक्षेत्रातील संस्था संघटना मंडळ यांचे फ ेडरेशन म्हणून अन्न अधिकार या विषयावर कार्यरत आहे. या फेडरेशनच्या माध्यमातून मुंबईतील विविध सामाजिक संस्था संघटना आणि मंडल रेशनच्या प्रश्नावर जनजागृती करत आहेत. मुंबई रेशनिंग कृती समितीच्या माध्यमातून या फेडरेशनचे कामकाज व मार्गदर्शन करण्यात येत आहे. १९९९ मधे रेशन साठी तिहेरी कार्ड योजना राबविण्यात आली होती.तिहेरी कार्ड योजना अंतर्गत पिवळ्या, केशरी व सफेद रंगाच्या उत्पन्न निहाय शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या होत्या. यासाठी १९९९ मध्ये पिवळ्या रंगाच्या म्हणजे दारिद्र्य रेषेच्या खालील लोकांना वार्षिक उत्पन्न १५ हजाराच्या आत ठरविण्यात आले होते व ज्यांनी आपले वार्षिक उत्पन्न १५ हजार रुपये लिहून दिले त्यांना पिवळ्या रंगाच्या म्हणजे दारिद्र्य रेषेच्या खालील बीपीएल शिधापत्रिका योजनेत समावेश करण्यात आला होता.

त्यानंतर ज्यांचे वार्षिक उत्पन्न १६ हजार ते एक लाखाच्या आत असेल त्यांना दारिद्य रेषेच्या वर एपीएल म्हणजे केशरी रंगाची शिधापत्रिका योजनेत समावेश करण्यात आला आणि ज्यांचे वार्षिक उत्पन्न १ लाखाच्या वर आहे किंवा त्यांनी तसे लिहून दिले त्यांना सफेद रंगाच्या म्हणजे शुभ्र रंगाच्या शिधापत्रिका देऊन रेशन व्यवस्थेच्या बाहेर काढण्यात आले. साधारण ८ करोड ७७ लाख लोक या तिहेरी कार्ड योजनाचे लाभार्थी होते.या पैकी पिवळ्या रंगाच्या म्हणजे दारिद्र्य रेषेच्या खालील लोकांना तत्कालीन प्रधानसेवक यांनी लागू केलेल्या अंत्योदय योजनेचा लाभ देताना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिका वरच अंत्योदय लाभार्थी असा शिक्का मारून लाभ देण्यात आला. म्हणजेच तिहेरी कार्ड योजना पण ४ स्तर करण्यात आले. जुलै २०१३ मध्ये अन्न सुरक्षा कायदा डॉ.मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात मंजूर करण्यात आला आणि फेब्रुवारी २०१४ पासून अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्याने देशातील ८० करोड आणि महाराष्ट्र राज्यातील ७ करोड १६ हजार जनतेला अन्न सुरक्षा कायदा लागू करण्यात आला.त्यामुळे पूर्वीच्या योजनेतील जवळपास दीड करोड लोकांना अन्न अधिकार नाकारण्यात आला. हा कायदा लागू करण्यासाठी अंत्योदय योजनेतील लाभार्थी जसेच्या तसे या योजनेत समाविष्ट करण्यात आले. उर्वरित बीपीएल आणि एपीएल कार्धधारक म्हणजे पिवळ्या आणि केसरी रंगाच्या शिधापत्रिका यांना शहरी आणि ग्रामीण भागात विभागून पीएचएच प्रायोरिटी हाऊस होल्ड प्राधान्य कुटुंब लाभार्थी आणि एन पी एच नॉन प्रायोरिटी होल्ड प्राध्यान्य कुटुंब नसलेले असे विभागणी करण्यात आले.

यासाठी शहरी भागातील ४५ टक्के आणि ग्रामीण भागातील ७५ टक्के लोकांचा समावेश करण्यात आला.पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिका सरळ पी.एच.एच. योजनेत समावेश करण्यात आल्या. परंतू केशरी रंगाच्या शिधापत्रिका यांना समावेश करताना ग्रामीण भागात वार्षिक उत्पन्न ४४ हजाराच्या आत ठरविण्यात आले आणि शहरी भागासाठी ५९ हजार रुपये वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ठरवून लाभार्थी निवड करण्यात आले. यामुळे पूर्वी ज्यांनी आपले वार्षिक उत्पन्न नोंद केली होती. त्यांना त्यांच्या शिधापत्रिकावर पी पीएच किंवा एनपीएच असे शिक्के मारण्यात आले.

केवळ ६,७ महिन्यात ही मोहीम पूर्ण करून फेब्रुवारी २०१४ पासून योजना सुरू करण्यात आली. म्हणजेच २०१४ मध्ये रेशन चा लाभ मिळण्यासाठी आर्थिक निकष ग्रामीण भागात ४४ हजाराच्या आत आणि शहरी भागात ५९ हजार रुपये वार्षिक उत्पन्न नोंद करण्यात आलेले यांचा समावेश करण्यात आला होता. २०१४ ते २०२६ या कालावधीत हा निकस बदलण्यात न आल्याने अनेक सामाजिक संघटना यांनी यावर आक्षेप नोंदविला आहे. याबाबत प्रशासनाकडे निकष बदलण्याची मागणीही करण्यात आली आहे.

---

## पत्रकारितेतील उत्कृष्ट कार्यासाठी वसंत रांधवण यांना ‘सत्यशोधक पत्रकारिता’ पुरस्कार




**अक्षराज : राजकुमार ईकडे**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष तसेच दैनिक अक्षराज चे अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी वसंत रांधवण यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय व सातत्यपूर्ण योगदानाबद्दल राज्यातील दैनिक अक्षराज मेडिया समूहाकडून दिला जाणारा यंदाचा सन २०२६ सत्यशोधक पत्रकारिता पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

हा सन्मान दैनिक अक्षराज वृत्तपत्राच्या पाचव्या वर्धापनदिन व स्नेह मेळावा नुकताच पुणे येथील पत्रकार भवन येथे ८९ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनिस, झोपडपट्टी सुरक्षा दलाचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम, सुप्रसिद्ध कवी हेमंत मुसरीफ दैनिक अक्षराज चे संपादक विनोद गोरे, सहसंपादीका प्राजक्ता चव्हाण – गोरे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. याप्रसंगी राज्यातील अक्षराज वृत्तपत्राचे प्रतिनिधी उपस्थितहोते.

समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडत, सामान्य नागरिकांच्या समस्या प्रभावीपणे मांडण्याचे कार्य वसंत रांधवण यांनी पत्रकारीतेतून सातत्याने केले आहे. त्यांच्या निर्भिड लेखनशैलीमुळे व सामाजिक बांधिलकीमुळे पत्रकारिता क्षेत्रात त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. याच कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी वसंत रांधवण यांच्या कार्याचे सर्वस्तरातून मुक्तकंठाने कौतुक करत, त्यांच्या पुढील पत्रकारितेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सम ाजाहितासाठी निस्वार्थ कार्य करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान हा प्रेरणादायी ठरतो. वसंत रांधवण यांना आजपर्यंत अनेक नामांकित पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे.

---

## रोहित तायक्वांदो अकादमीचे स्पर्धेत घवघवीत यश...




**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.२०, मुंबई :** चेंबूर येथे कलेक्टर कॉलनी मनपा शाळेत SSN World Taekwondo Club यांच्या वतीने ३री सबर्बन मुंबई सब – जुनिअर आणि पी वी इंटरक्लब तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२६, दि.१६ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजन करण्यात आले.

ह्या स्पर्धेत परेल – भोईवाडा येथील रोहित तायक्वांदो अकादमीने ७ सुवर्ण, ३ रौप्य आणि ४ कांस्यपदकांची कमाई करत द्वितीय क्रमांकाची ट्रॉफी पटकावली. ही स्पर्धा वय वर्षे ६, ८ व १२ वर्षाखालील मुला –मुलींच्या वयोगटात खेळवण्यात आली. स्पर्धेच्या प्रमुख उदघाट्न सोहळ्यास अतिथी म्हणून अक्षराज वर्तमानपत्र व मीडियाचे पत्रकार सुनिल साखरकर तसेच आयोजक असीम सिंग सोदी, स्पर्धा व्यवस्थापन पंच कमिटी यांची उपस्थिती होती.

या स्पर्धेतील रोहित तायक्वांदो अकादमीचे पदक विजेते खालीलप्रम ाणे. **सुवर्णपदक विजेते :**

सान्वी बडंबे, वरद सोलिम, रुणाली सोनावणे, देवांश झिंगाडे, म धुश्री डिचोलकर, सिद्धार्थ जाधव आणि सम्यक कासे.

**रौप्यपदक विजेते :**

स्मिथ बासुतकर, दित्या लोहार आणि ध्रुवी जाधव.

**कांस्यपदक विजेते :**

मंजिरी डिचोलकर, आकृती ठाकूर, श्लोक झिंजोरडे आणि अरुष गुरव.

या उल्लेखनीय यशाबद्दल प्रमुख प्रशिक्षक रोहित राहुल कदम सर, सह मार्गदर्शक ज्यांनी खेळाडूंच्या मेहनतीसोबत सातत्याने मार्गदर्शन व सरावासाठील सहकार्य करणाऱ्या ग्रिष्मा मॅडम, नेत्रा मॅडम यांचे मोलाचे योगदान लाभले. खेळाडूंच्या यशाबद्दल अकादमीच्या पालक वर्गाकडून अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे.

---

## दिवा-शिळफाटा-महापे-कोपरखैरणे मेट्रोसाठी नगरसेवक पाटील आग्रही
### बाबाजी पाटील आणि अर्चना पाटील खा.शिंदेकडे केले निवेदन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, दिवा (ठाणे) :** दिवा, खार्डी, शिळफाटा, महापे एमआयडीसी आणि कोपरखैरणे या वेगाने विकसित होत असलेल्या परिसरातील वाढती लोकसंख्या आणि वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर या भागाला थेट मेट्रोने जोडण्याची मागणी करण्यात आली आहे. नगरसेवक बाबाजी बाळाराम पाटील आणि नगरसेविका अर्चना पाटील यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची मलबार हिल येथील नंदनवन बंगल्यावर भेट घेऊन याबाबत निवेदन दिले.

या मेट्रो मार्गाची दिवा परिसरातील म्हातार्डी येथे प्रस्तावित मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या ठाणे स्थानकाशी जोडणी करण्याची शक्यताही तपासण्याची मागणी करण्यात आली. मेट्रो, उपनगरीय रेल्वे, बुलेट ट्रेन आणि रस्ते निवेदन यांची सांगड घातल्यास दिवा परिसर भविष्यातील महत्त्वाचे वाहतूक केंद्र म्हणून विकसित होऊ शकते, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. दिवा- खार्डी–शिळफाटा परिसरातील काही रस्ते अरुंद असल्याने मोठ्या प्रमाणावर रस्ते रुंदीकरण किंवा भूसंपादन करणे आव्हानात्मक ठरू शकते. त्यामुळे उपलब्ध वाहतूक पट्ट्याचा वापर करून उन्नत मेट्रो मार्ग उभारण्याचा तांत्रिक अभ्यास करावा, अशी मागणीही करण्यात आली. पुढील २५ ते ३० वर्षांतील प्रवासी आणि वाहतूक वाढीचा विचार करून या प्रकल्पाचा दीर्घकालीन आराखडा तयार करण्याची मागणी करण्यात आली. दिवा शहरात लहान मुलांसाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी मोठे उद्यान आणि नाना–नानी पार्क उभारण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. याबाबत संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन खासदार शिंदे यांनी दिल्याचे नगरसेवक बाबाजी पाटील आणि नगरसेविका अर्चना पाटील यांनी सांगितले. यावेळी विभागप्रमुख निलेश पाटील उपस्थित होते.

दिवा- खार्डी- शिळफाटा- महापे एमआयडीसी–कोपरखैरणे असा थेट मेट्रो कॉरिडॉर विकसित करण्याच्या शक्यतेचा शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. या मार्गावर मेट्रो सुरु झाल्यास दिवा, खार्डी आणि शिळफाटा परिसरातील लाखो नागरिकांना त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे. या परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक नवी मुंबईत नोकरी आणि व्यवसायासाठी ये–जा करतात. त्यामुळे दिवा आणि नवी मुंबईदरम्यान थेट आणि जलद सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध होऊ शकते.

**रखडलेले रस्ते, नाना–नानी पार्कचाही मुद्दा**

प्रभागातील गेल्या दोन वर्षांपासून रखडलेल्या रस्त्यांच्या कामाचाही मुद्दा खासदार शिंदे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. नॅशनल शाळेपासून साबेगावला जोडणारा तसेच वैभव ढाब्यापासून जीवदानी नगरला जोडणारा रस्ता बंद अवस्थेत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत खासदार शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्याचे नगरसेवकांनी सांगितले.

---

## कल्याण-शिळफाटा रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा ; भूमिपुत्रांना मिळणार १३८.४५ कोटींचा मोबदला

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, कल्याण (ठाणे) :** ठाणे, नवी मुंबई आणि कल्याण–डोंबिवलीला जोडणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या अशा कल्याण–शिळफाटा रस्त्याच्या रुंदीकरणातील सर्वात मोठा अडथळा आता दूर झाला आहे. रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्या स्थानिक भूमिपुत्रांना महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून तब्बल १३८.४५ कोटी रुपयांचा मोबदला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे विशेष प्रयत्न आणि कल्याण ग्रामीण मतदारसंघाचे आमदार राजेश मोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तब्बल ३५ वर्षानंतर भूमिपुत्रांना हा हक्काचा न्याय मिळाला आहे. या निर्णयामुळे भूसंपादनाचा तिढा सुटून कल्याण–शिळफाटा रस्त्यावरील रखडलेले काम मार्गी लागणार असून, येथील भीषण वाहतूक कोंडी कायमची फुटणार आहे. मंगळवारी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांच्या हस्ते भूमिपुत्रांना मोबदला पत्र देण्यात आले. कल्याण–शिळफाटा हा रस्ता अत्यंत वर्दळीचा असून, या रस्त्याचे सहापदरीकरण आणि काँक्रिटीकरणाचे काम 'एमएसआरडीसी'च्या माध्यमातून सुरू आहे. मात्र, या रस्त्याच्या कामासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा योग्य मोबदला न मिळाल्याने प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी आणि स्थानिकांनी तीव्र विरोध दर्शवला होता. जोपर्यंत हक्काचा मोबदला मिळत नाही, तोपर्यंत काम करू न देण्याची भूमिका भूमिपुत्रांनी घेतल्याने रस्त्याचे काम काही ठिकाणी रखडले होते. परिणामी, अपूर्ण कामांमुळे या मार्गावर काटई नाका, पलावा चौक आणि शिळफाटा परिसरात दररोज भीषण वाहतूक कोंडी होत होती. याचा नाहक त्रास लाखो चाकरमान्यांना सहन करावा लागत होता.लवकरच 'एमएसआरडीसी'कडून या मोबदल्याचे वाटप बाधित शेतकऱ्यांना आणि भूमिपुत्रांना केले जाणार आहे.

वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रकल्पांबाबत एमएमआरडीए मुख्यालयात महत्त्वपूर्ण पार पडलेल्या या बैठकीत कल्याण–शीळ रस्त्यावरील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी घृचउ हद्दीतील रिंगरूट टप्पा क्रमांक १, २ आणि ३ मधील अडथळे दूर करून कामे तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच कल्याण फाटा सर्कल ते डायघर पोलीस स्टेशन व कल्याण फाटा ते पूजा पंजाब हॉटेल या मार्गांची तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला देण्यात आले आहेत. तसेच TMC हद्दीतील डायघर–उत्तरशीव रस्ता, पडले–तावशी–भारत गिअर रस्ता, शालू हॉटेल–शीळफाटा रस्ता (कल्याण–शीळ समांतर रस्ता). हे ठामपा हद्दीतील ६झ मधील प्रमुख रस्ते लवकरात लवकर सुरू करून वाहतुकीसाठी खुले करण्याची विनंती केली त्यावर सकारात्मक आश्वासन मा. ठाणे महानगरपालिका आयुक्तांनी दिले आहे. या सर्व उपाययोजना प्रत्यक्षात आल्यास कल्याण–शीळ रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या लाखो नागरिकांना नजीकच्या काळात वाहतूककोंडीतून मोठा दिलासा मिळेल,अशी आशा आहे.

# स्फोटकांनी भरलेल्या व्हॅनची आग विझवून टळला मोठा अनर्थ

## खापरखेडा पत्रकार संघाकडून मुस्लिम बांधवांचा सत्कार

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** जवळपास ६ टन अत्यंत संवेदनशील स्फोटकांनी (बारूद) भरलेल्या एका व्हॅनच्या टायरला धूर निघून आग लागल्याची घटना दिनांक १८ ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास खापरखेडा येथील चिकन मार्केटसमोर घडली.

मात्र स्थानिक मुस्लिम बांधवांनी जीवाची पर्वा न करता दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे एक मोठा अपघात टळला आहे.स्फोटकांचा साठा असलेल्या एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या टायर मधून धूर निघत असल्याचे दिसताच परिसरात भितीचे वातावरण पसरले होते. मात्र, स्थानिक चिकन विक्रेते शफीक अन्सारी, अकरम कुरेशी आणि तौशिफ फजलानी यांनी वेळेवर समयसूचकता दाखवली. तात्काळ घटनास्थळी धाव घेत एक्सप्लोसिव्ह व्हॅनच्या टायरवर पाण्याचा मारा केला व अथक प्रयत्नांनंतर आग पूर्णपणे विझवली या तिघांच्या धैर्यामुळे खापरखेडा परिसरातील हजारो नागरिकांचे प्राण वाचले.या तीन मुस्लिम बांधवांची उल्लेखनीय कार्याची दखल घेत नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघ संलग्न खापरखेडा पत्रकार संघाच्या वतीने भीमालय कार्यालयात सत्कार सोहळ्याचे आयोजन १९ ऑगस्ट बुधवारला सायंकाळी करण्यात आले होते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आरपीआय) नेते पृथ्वीराज बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते शफीक अन्सारी, अक्रम कुरेशी व तौशिफ फजलानी यांचा शाल, श्रीफळ आणि वृक्ष भेट देऊन भावूक वातावरणात गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना तिन्ही सत्कारमूर्तींनी ये तो हमारा फर्ज था अशा शब्दांत आपल्या



भावना व्यक्त केल्या. यावेळी अध्यक्षीय भाषणात बोलताना पृथ्वीराज बोरकर व इतर मान्यवरांनी सांगितले की स्फोटक वाहनाची आग विझवून हजारो लोकांचे प्राण वाचवणे हे केवळ धैर्याचे काम नाही तर ते हिंदू-मुस्लिम एकतेचे एक उत्तम प्रतीक आहे. समाजासमोर आदर्श निर्माण करणारे आणि प्रत्येकाला प्रेरणा देणारे हे कार्य आहे असे सांगितले.या सोहळ्याला अशोक झिंगरे, राहुल तिवारी, हेमराज परिहार, शामराव सरोदे, राहुल बागडे, दिवाकर घेर, अमर जैन, मनोज डेव्हिड, कपिल वानखेडे, केशव पानतावणे, विलास महल्ले, अनेश चवरे, पुरुषोत्तम मानकर, कृष्णदेव सोनी, विनोद गोडबोले, मयूर तुरपुडे, विक्की थापा, मनोहर डोंगरे, नरेश पानतावणे, धीरज देशभ्रतार ययांच्यासह पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन खापरखेडा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुनील जालंदर यांनी केले, तर आभार सचिव अभय मिशा यांनी मानले.

---

# चंद्रपूर जिल्हा नियोजन समिती तथा जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या बैठकीस खासदार डॉ.किरसान यांची दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थिती




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हा नियोजन समिती तथा जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या बैठकीस गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव जी किरसान यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित राहून लोकसभा क्षेत्रातील शेतकरी, महिला, युवक आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

प्रलंबित विकासकामांना गती देण्यासोबतच शेतकऱ्यांच्या अडचणी तातडीने दूर करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. सावली तालुक्यातील व्याहाड (बुज) येथील जिल्हा परिषद शाळेच्या जीर्ण इमारतीच्या निर्लेखनाचा प्रस्ताव मागील एक ते दीड वर्षांपासून प्रलंबित असल्याचा मुद्दा खा. डॉ. किरसान यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक झालेल्या या इमारतीवर तातडीने कार्यवाही करून नवीन शाळा इमारतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

सिंदेवाही तालुक्यातील रत्नापूर येथील उमा नदी घाट धम्मभूमीला 'क' दर्जाचे पर्यटनस्थळ घोषित करण्याचा विषय यापूर्वीच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मांडण्यात आला होता. मात्र, अद्याप कार्यवाही न झाल्याने हा विषय बैठकीच्या इतिवृत्तात घेऊन पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असेही त्यांनी सांगितले. सिंदेवाही तालुक्यात पाण्याअभावी अनेक शेतकऱ्यांची धानाची रोवणी आणि शेतीची कामे रखडली आहेत. त्यामुळे गोसेखुर्द उजव्या कालव्याच्या घोडाझरी उपकालव्यातून शेतीसाठी तातडीने पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी खासदार डॉ. किरसान यांनी केली. तसेच सावली तुकुम गट क्रमांक १ येथील जीर्ण झालेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची म ागणीही त्यांनी केली.

चिमूर - सिंदेवाही - आरमोरी राज्य मार्ग क्रमांक ३२२ ची झालेली दुरवस्था आणि या मार्गावर सुरू असलेली अवजड व ओव्हरलोड वाहनांची वाहतूक याकडेही त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. रस्त्याची प्राधान्याने दुरुस्ती व मजबुतीकरण करण्यासोबतच ओव्हरलोड वाहनांवर प्रभावी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

नागभीड महावितरण कार्यालयाकडे मिंथूर, मिंडाळा, कोदेपार व इतर गावांतील १३ शेतकऱ्यांनी सुमारे दोन वर्षांपूर्वी वीज जोडणीसाठी अर्ज केले आहेत. सिंचनासाठी या शेतकऱ्यांनी स्वतः पाइपलाईनची व्यवस्था केली असतानाही स्वतंत्र ट्रान्सफॉर्मरसाठी सुमारे १० ते १२ लाख रुपयांचा खर्च करण्याची अट त्यांच्यासमोर ठेवण्यात आली आहे. हा खर्च शेतकऱ्यांना परवडणारा नसल्याने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून ट्रान्सफॉर्मर बसवावा आणि प्रलंबित वीज जोडण्या तातडीने देण्यात याव्यात, अशी मागणी खासदार डॉ. किरसान यांनी केली.

चालू पावसाळ्यात अनेक भागात अत्यल्प पाऊस झाल्यामुळे धानाची रोवणी करता न आलेल्या शेतकऱ्यांचे कृषी विभागामार्फत गावनिहाय तातडीने सर्वेक्षण करावे, अशीही मागणी त्यांनी केली. अशा शेतकऱ्यांना आगामी रब्बी हंगामासाठी आवश्यक बियाणे मोफत अथवा अनुदानित दरात उपलब्ध करून देण्यासोबतच पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व कृषी सहाय्य योजनांचा लाभ मिळवून द्यावा, असे सूचना देखील त्यांनी केले.

बैठकीस आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार विजय वडेट्टीवार, सुधाकर अडबाले, अभिजीत वंजारी, सुधीर म ुनगंटीवार, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, करण देवतळे यांच्यासह जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी सुभाष कुंभरे आदी उपस्थित होते.

लोकसभा क्षेत्रातील जनतेच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देऊन प्रलंबित विकासकामे आणि शेतकरी हिताच्या मागण्यांवर प्रशासनाने तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी बैठकीत व्यक्त केली.

---

# मोठे भोम जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व छत्र्यांचे वाटप

**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.२०, उरण (रायगड) :** रायगड जिल्हा परिषद शाळा, मोठे भोम येथे इयत्ता पहिली ते चौथीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच छत्र्यांचे वाटप करण्याचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सामाजिक बांधिलकी जपत चंद्रशेखर सोमण व ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्या पुढाकाराने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देतानाच त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला, चंद्रशेखर सोमण हे तळोजा येथील विस्टा फूड, देवीचा पाडा येथे सल्लागार म्हणून कार्यरत असून सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रांचा सखोल अभ्यास असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे.

माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या कार्यकाळात महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास मंडळाचे संचालक म्हणून त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. तसेच 'पोलीस मित्र' म्हणूनही त्यांची विशेष ख्याती आहे. प्रसिद्धीपासून दूर राहून सामाजिक कार्याला महत्त्व देणारे आणि गरजू व्यक्तींना शक्य त्या पद्धतीने मदत करणारे अनोखे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.मोठे भोम जिल्हा परिषद शाळेशीही सोमण यांचे विशेष नाते राहिले आहे. यापूर्वी शाळेला संगणक उपलब्ध करून देण्यात त्यांच्या प्रयत्नांचा महत्त्वाचा वाटा होता. विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी संगणकासारख्या शैक्षणिक साधनांची गरज ओळखून त्यांनी केलेले प्रयत्न शाळेसाठी उपयुक्त ठरले आहेत. याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व छत्र्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना चंद्रशेखर सोमण यांनी मोठे भोम शाळेतील वातावरणाबद्दल समाधान व्यक्त केले. शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व शाळा



व्यवस्थापन समिती यांच्यातील सकारात्मक वातावरणाचे त्यांनी कौतुक केले. शाळेच्या विकासासाठी भविष्यात कोणत्याही प्रकारची गरज भासल्यास निःसंकोचपणे सांगावे, आपण आपल्या परीने सहकार्य करण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी केलेली मदत ही समाजासाठी केलेली सर्वात मोठी गुंतवणूक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा आणि योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते निश्चितच मोठी प्रगती करू शकतात, असा संदेश त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून दिला. विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा, चांगले संस्कार आत्मसात करावेत आणि भविष्यात आपल्या गावाचे व समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी रायगड व नवी मुंबई परिसरातील प्रसिद्ध ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनीही विद्यार्थ्यांना तसेच उपस्थित शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. पत्रकारितेच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत प्रशासनाच्या वतीने त्यांचा 'रायगड भूषण' पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे केवळ परीक्षेच्या दृष्टीने न पाहता ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीने पाहावे, वाचनाची आवड जोपासावी आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले.माधव पाटील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ग्रामीण भागातील शाळांचे महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि क्षमता मोठ्या प्रमाणात आहे. मात्र त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. समाजातील दानशूर व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी अशा शाळांच्या गरजा लक्षात घेऊन मदतीचा हात पुढे करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाला चंद्रशेखर सोमण यांचे मित्र महेश गाडगीळ, दैनिक अक्षराजचे रायगड जिल्हा प्रतिनिधी संग्राम ठाकूर, ग्रामस्थ मंडळ मोठे भोमचे माजी अध्यक्ष किशोर केणी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संकेत पाटील, शाळेचे मुख्याध्यापक रोहन पाटील, शिक्षक बडतोड, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा भारती पाटील, हेमा गावंड, निकिता पाटील, पूनम पाटील, प्रीती पाटील यांच्यासह शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक रोहन पाटील यांनी अत्यंत योग्य पद्धतीने केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाची रूपरेषा त्यांनी मांडली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व छत्र्यांचे वाटप करण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मि ळाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित ग्रामस्थ, पालक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी कौतुक केले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना केवळ आवश्यक साहित्य मिळत नाही, तर त्यांच्या मनात शिक्षणाबद्दल सकारात्मकता निर्माण होऊन आत्मविश्वास ही वाढतो. त्यामुळे मोठे भोम शाळेत राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरला.

---

## थोडक्यात बातम्या

# श्रीराम बालाराम पन्नामी यांचे देहदान

## मानवतेच्या सेवेसाठी प्रेरणादायी निर्णय



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** वयाच्या ८०व्या वर्षीही काहीतरी नवीन आणि समाजोपयोगी करण्याची जिद्द जपणारे खापरखेडा वीज केंद्रातील सेवानिवृत्त कर्मचारी श्रीराम बालाराम पन्नामी यांनी मृत्यूनंतरही समाजाच्या उपयोगी पडण्याचा प्रेरणादायी निर्णय घेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे देहदान केले.त्यांचा देह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शरीर रचनाशास्त्र (Anatomy) विभागाकडे वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी मृत्यू नंतर सुपूर्द करण्यात येणार. वैद्यकीय विद्यार्थ्यांना मानवी शरीराची रचना, अवयवांची कार्यपद्धती आणि विविध वैद्यकीय बाबींचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यासाठी देहदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आयुष्यभर प्रामाणिकपणे सेवा बजावल्यानंतर निवृत्तीचे जीवन जगत असताना ही पन्नामी यांनी समाजासाठी काहीतरी वेगळे करण्याची भावना जपली. माझ्या मृत्यू नंतरही माझे शरीर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या भावी डॉक्टरांच्या ज्ञानासाठी उपयोगी पडावे, या उदात्त भावनेतून त्यांनी देहदानाचा निर्णय घेतला. त्यांचा हा निर्णय केवळ देहदान नसून ज्ञानदान आणि मानवसेवेचा अनोखा आदर्श ठरला आहे. आजच्या काळात देहदानाबाबत समाजात जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. अशा परिस्थितीत वयाच्या ८०व्या वर्षी पन्नामी यांनी घेतलेला हा निर्णय निश्चितच समाजातील इतर नागरिकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या देहदानामुळे वैद्यकीय क्षेत्रातील भावी पिढीला अभ्यासासाठी अमूल्य योगदान मिळणार असून, त्यांच्या सेवाभावी विचारांची आठवण दीर्घकाळ कायम राहणार आहे.सेवानिवृत्तीनंतर ही समाजासाठी काहीतरी देण्याची धडपड आणि मृत्यूनंतरही मानवतेच्या सेवेत योगदान देण्याची भावना श्रीराम बालाराम पन्नामी यांचे देहदान खऱ्या अर्थाने मानवतेला वंदन करणारे कार्य ठरले आहे. श्रीराम बालाराम पन्नामी यांच्या या सेवाभावी, मानवतावादी आणि अनुकरणीय निर्णयाला सर्व सामाजिक स्तरावर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

---

# भिसेगावचे बंद शौचालय पुन्हा सुरू होणार; महिलांना दिलासा



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२०, कर्जत (रायगड) :** भिसेगाव एसटी बस स्टॉप येथील गेल्या काही म हिन्यांपासून बंद असलेले सुलभ शौचालय पुन्हा सुरू करण्यात यावे. यासाठी कर्जत येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राहुल देवांग यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी शौचालय सुरू करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. यावेळी जय अंबे रिक्षा चालक - मालक संघटनेचे सचिव विजयजी शिंदे समाजसेवक राकेश देशमुख उपस्थित होते. भिसेगाव नाक्यावर नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. रेल्वे तसेच एसटी बसने प्रवास करण्यासाठी महिला व नागरिक मोठ्या संख्येने या ठिकाणी येत असतात. मात्र, सार्वजनिक शौचालय बंद असल्याने विशेषतः महिलांची मोठी गैरसोय होत आहे. 'वूलू पावडर रूम' हे महिलांसाठी स्वच्छ, सुरक्षित व सहज उपलब्ध असणारे स्मार्ट स्वच्छता आणि शौचालय नेटवर्क म्हणून या ठिकाणी सुरू करण्यात आले होते. सदर शौचालयाचे उद्घाटन करून ते नागरिकांसाठी खुले करण्यात आले होते. सुरुवातीला सुमारे ५ ते ६ महिने शौचालय सुरू होते; मात्र त्यानंतर ते आजतागायत बंद असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

महिलांची गैरसोय लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राहुल देवांग यांच्याशी चर्चा करण्यात आली. यावेळी सदर शौचालय लवकरच खुले करून नागरिकांच्या सेवेत सुरू करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. शौचालय पुन्हा सुरू झाल्यास भिसेगाव नाक्यावर येणाऱ्या महिला, प्रवासी तसेच नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार असून परिसरातील स्वच्छतेलाही हातभार लागणार आहे.

---

# ऊर्जानगर (चंद्रपूर) येथे महानायक वसंतराव नाईक स्मृतिदिन कार्यक्रमात गुणवंताचा सत्कार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** दिनांक १८ ऑगस्ट हा माजी मुख्यमंत्री महानायक वसंतराव नाईक यांचा स्मृतिदिन म्हणून साजरा केला जातो. महानायक वसंतराव नाईक हे सतत ११ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळी परिस्थिती, ग्रामीण अर्थव्यवस्था, पंचायत राज इत्यादी अनेक प्रश्नांची त्यांनी सोडवणूक करून आधुनिक महाराष्ट्राचा पाया घातला. 'शेतकरी जगला तर मानव जगेल' हे त्यांचे म्हणणे होते, म्हणूनच ते 'हरित क्रांतीचे प्रणेते' या नावाने ओळखले जातात. अशा या महानायकास अभिवादन करण्याकरता दिनांक १८ ऑगस्ट २०२६ ला 'स्नेहबंध' सभागृह ऊर्जानगर, चंद्रपूर येथे स्मृतिदिन कार्यक्रम घेण्यात आला. यानिमित्ताने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सेवानिवृत्त व पदोन्नती झालेले समाजबांधव यांचा सत्कार सुद्धा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. ट्राफिक ऑफिस जवळील वसंतराव नाईक चौक येथे कार्यक्रमापूर्वी सर्व समाज बांधवांतर्फे अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष सेवानिवृत्त मुख्य अभियंता श्यामभाऊ राठोड होते तर प्रमुख अतिथी भा.बं.स. क. सेवा संस्थाचे राष्ट्रीय महासचिव अशोक राठोड, पीएचडी प्राप्त प्रा. डॉ. संजय चव्हाण, बाळू राठोड, उपकुलसचिव एस.एन.डी.टी.विद्यापिठ, बल्लारपूर , ज्येष्ठ मार्गदर्शक पुरणसिंग चव्हाण, दयाराम हांडे, चंद्रपूर चे नायकवसंत राठोड, नायक दशरथ राठोड, इंजि. संजय राठोड, प्रा. विश्वनाथ राठोड, कोषाध्यक्ष. वर्षा राठोड, शितल जाधव, प्राचार्य चरणदास राठोड हे उपस्थित होते.सर्वप्रथम दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज व महानायक वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विश्वनाथ राठोड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मार्गदर्शनकेले. प्रमुख मान्यवरांचे मार्गदर्शन झाल्यानंतर वर्ग चौथी ते बारावी, पदविका, पदवी व पदव्युत्तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त व पदोन्नती झालेले कर्मचारी यांचा सुद्धा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थी, इंजिनिअर, डॉक्टर झालेले विद्यार्थी नवनियुक्त कर्मचारी या सर्वांचा सन्मान करण्यात आला.आयोजन समितीचे पदाधिकारी अध्यक्ष प्रकाश राठोड, सचिव सुरेश पवार, कोषाध्यक्ष सुदाम राठोड, सदस्य प्रा. गणेश चव्हाण सर, जय राठोड, भोजराज आडे, अक्षय राठोड, विकास चव्हाण, अक्षय चव्हाण, शरद पवार, सुनील चव्हाण, हेमंत पवार , अंबादास चव्हाण, प्रमोद राठोड यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरता परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे संचालन जयदीप राठोड यांनी केले तर आभार प्रमोद राठोड यांनी मानले.शेवटी सहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास चंद्रपूर शहरातील, ऊर्जानगर व चिचाळा येथील समाज बांधव व भगिनी बहुसंख्येने हजर होते.